जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 8 JUN 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'आव्हान २०१७'चा शनिवारी समारोप

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात १ जूनपासून सुरू असलेल्या 'आव्हान-२०१७' या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराचा समारोर शनिवारी (ता. १० जून) होणार आहे. राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती सी. विद्यासागर राव या कार्यक्रमाला खास उपस्थित राहणार आहेत.

विद्यापीठातून

शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचे 'आव्हान-२०१७' हे राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर सुरू आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एनडीआरएफ) जवानांतर्फे देण्यात येत असलेल्या या प्रशिक्षणात राज्यातील १४ विद्यापीठातील सुमारे १२०० विद्यार्थी सहभागी झाले आहेत. शिबिराचा समारोप शनिवारी (ता. १० जून) होईल. यासाठी राज्यपाल उपस्थित राहणार आहेत. शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्राच्या सभागृहात सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, महापौर हसीना फरास, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार आदी उपस्थित राहणार आहेत.

## नामकरणाची मागणी

शिवाजी विद्यापीठाचे नामकरण 'छत्रपती शिवाजी विद्यापीठ' असे करावे अशी मागणी भाजपा सांगली जिल्हा उपाध्यक्ष डॉ. सतीश पाटील आणि ह्यूमन राइटसचे कोल्हापूर जिल्हाध्यक्ष डॉ. प्रशांत माने यांनी केली आहे. याबाबत त्यांनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि खासदार संभाजीराजे छत्रपती यांना निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, शिवाजी विद्यापीठ अशा नावामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा एकेरी उल्लेख होतो. हे टाळण्यात यावे.

8 JUN 2017 लोकमत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे 'गूळ' संशोधन

गेल्या आठवड्यात आलेल्या एका बातमीचे मला फारच अप्रूप वाटले. ती बातमी शिवाजी विद्यापीठाने गूळ उद्योगासंबंधी केलेल्या कराराची होती. कोल्हापुरात गूळ गुणवत्ता तपासणी प्रयोगशाळा स्थापन करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. त्यासाठी मुंबईच्या राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे (आरजीएसटीसी) सहकार्य घेतले जाणार आहे. तशी ही चांगली गोष्ट असतानाही त्याचे अप्रूप वाटण्याचे कारण असे की, कोल्हापूरच्या गूळ उद्योगाला शेकडो वर्षांची परंपरा आहे. विद्यापीठाची स्थापना होऊनही पाच-सहा दशके होत आली. एवढा कालावधी गेल्यानंतर विद्यापीठाला गुळासारखा असा काही या मातीतला उद्योग आहे व त्याबद्दल आपण काही तरी केले पाहिजे असे वाटावे याचे अप्रूप वाटले. विद्यापीठ त्यांना वाटते ते शिकवत गेले व जी या प्रदेशाची गरज आहे, त्याचे प्रश्न आहेत,



अडचणी आहेत त्यांची उत्तरे देणारी यंत्रणाच आजपर्यंत अस्तित्वात आली नाही. गूळ, साखर आणि दूध ही कोल्हापूरच्या अर्थकारणाच्या मुख्य धमण्या आहेत; परंतु त्यासंबंधीचे शिक्षण, प्रशिक्षण देणारी, संशोधन करणारी आणि त्यांच्यावर शेतकऱ्यांचा विश्वास असणारी व्यवस्था आतापर्यंत उभी राहिलेली नाही.

पिवळा धमक म्हणजेच कोल्हापुरी गूळ अशी आपल्या गुळाची देशभरच नव्हे तर जगभर ओळख झाली आहे. कोल्हापूरइतकी राज्यात मोठी बाजारपेठ अन्यत्र नाही. राज्यातील एकूण उत्पादनाच्या तब्बल ४० टक्के उत्पादन एकट्या कोल्हापूर जिल्ह्यात होते. हंगामात सरासरी ३० किलोच्या ३० लाख रव्यांची आवक बाजार समितीत होते. वार्षिक उलाढाल २५० कोटींची आहे. बाजार समितीला किमान तीन कोटी रुपयांपर्यंतचे उत्पन्न सेसच्या माध्यमातून प्रतिवर्षी मिळते. जिल्ह्यात सुमारे आठशे गुऱ्हाळघरे आहेत; असे सांगितले जाते परंतु गंमत अशी की ही गुऱ्हाळे कुणाची आहेत, ती प्रतिवर्षी सुरू केली जातात का, ती किती गूळ उत्पादन करतात, त्यांच्या गुळाची प्रत काय आणि ते पिकवलेल्या गुळाचे काय करतात यासंबंधीची काहीच माहिती समितीपासून विद्यापीठापर्यंत कोणत्याच यंत्रणेकडे आजच्या घडीलाही नाही. विद्यापीठाच्या शिक्षणात, संशोधनात स्थानिक प्रश्नांचे प्रतिबिंब पडले पाहिजे व त्याच्या सोडवणुकीसाठी या संस्थांनी किमान प्रयत्न केले पाहिजेत अशी अपेक्षा असते; परंतु ती अपेक्षा आतापर्यंत फोल ठरली आहे. ही विद्यापीठाची स्थिती असली तरी अन्य संस्थांनीही फार चांगले काम केले आहे असा अनुभव नाही. बाजार समितीच्या प्रवेशद्वारासमोरच कृषी विद्यापीठाचे गूळ संशोधन केंद्र आहे; परंतु तिथेही आपले प्रश्न घेऊन किती शेतकरी जातात व त्यांच्या प्रश्नांची तिथे आस्थेने सोडवणूक होते हा एक नवीनच संशोधनाचा विषय आहे.

बाजारात 'कोल्हापुरी गुळा'च्या नावाखाली सुमार दर्जाचा माल ग्राहकांच्या माथी मारला जातो. मात्र, त्याला मूळ कोल्हापुरी गुळाच्या चवीची सर नाही. कोल्हापुरी गुळाची अशी कोणती वैशिष्ट्ये आहेत, जी त्याला इतर ठिकाणच्या गुळापासून वेगळे दर्शवितात, याचा अभ्यास करणे आणि शेतकरी व गूळ उत्पादकांसाठी गुणवत्ता नियंत्रणविषयक तसेच संशोधनविषयक सुविधा निर्माण करण्याविषयी चाचपणी करणे या दिशेने काम करण्याची गरज लक्षात घेऊन विद्यापीठ आणि राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाने परस्पर सहकार्य करण्याचा निश्चय केला आहे. असा निश्चय अनेकदा व्यक्त झाला आहे. यापूर्वी कोल्हापूर गुळाचे क्लस्टर करण्याचे प्रयत्न झाले. त्यासाठी शासनाकडून काही कोटी रुपयांची उधळण झाली. त्याचे पुढे काय झाले कुणालाच माहीत नाही. शीतगृह, हमीभाव, पणन मंडळाकडून गूळ खरेदी, शेतमाल तारण योजनेत समावेश असे काही प्रश्न प्रलंबित असल्याच्या बातम्या आम्ही पत्रकारितेत आल्यापासून गेली २२ वर्षे देत आहोत; परंतु ते प्रश्न जागच्या जागी आहेत. फार लांबचे राहू दे, गुळासाठी लागणारी काहिल, त्याचा घाणा, गुळव्याचे प्रशिक्षण आणि उत्पादनपद्धती यामध्येही १०-२० टक्केही बदल झालेला नाही. तरीही हा उद्योग शेतकऱ्यांच्या कष्टावर व हिमतीवर उभा आहे. मसाला बोर्ड झाले, चहा उत्पादकांसाठी टी बोर्ड झाले; परंतु गूळ उत्पादकांसाठी असे बोर्ड स्थापन होऊ शकलेले नाही. कारण ती राज्यकर्त्यांची मानसिकता नाही. आम्ही छातीवर हात ठेवून मोठ्या अभिमानाने गुळाची थोरवी गातो परंतु त्या उद्योगाचे प्रश्न सोडविण्यासाठी मात्र काय करत नाही असा आतापर्यंतचा अनुभव गाठीशी आहे, म्हणूनच विद्यापीठाने त्यात किमान पुढाकार घेतला याचे अप्रूप वाटले. विद्यापीठाने 'नॅक'चे मानांकन वाढवून मिळविण्यापुरतेच हे काम मर्यादित ठेवू नये. त्यातून खरंच शेतकऱ्यांची एक अडचण दूर झाली तरी या कराराचे फलित झाले असे म्हणता येईल.

- विश्वास पाटील

kollokmatpratisad@gmail.com